# Captured in 2 petabytes, 23,000 hours of beloved music, dance and cultural pieces

ANJALI MARAR
PUNE, DECEMBER 12

A FIRST-OF-ITS-KIND digital repository, which is a treasure trove of 23,000 hours of rare cultural pieces — encompassing music, dance, drama and cinema — has recently been awarded an ISO certification.

The pilot project, called National Cultural Audiovisual Archive (NCAA), is a joint effort between the city-based Centre for Development of Advanced Computing (C-DAC) and the Indira Gandhi National Culture for Arts (IGNCA).

'Digitalay', a tool conceived and developed by C-DAC, was used to develop the digital repository that today includes over 9,600 audiovisual files.

The invaluable pieces of music, dance and more were contributed by as many as 21 national institutions, including Kalakshetra Foundation, National Archives of India, Natya Shodh Sanstha, Indira Gandhi Rashtriya Manav Sangrahalay,



The cultural pieces were contributed by 21 institutions

Kerala Kalamandalam, Regional Resources Centre for Folk Performing Arts, Sahitya Akademi, Sangeet Natak Akademi and Shri Kashi Sangeet Samaj. By March 2018, the team aims to finish compiling and digitising 30,000 hours of cultural events.

"As technology and software are being upgraded at such a rapid pace, many digital files and documents will become obsolete soon, if not appropriately archived digitally," said Dinesh Katre, associate director of human-centred design and computing at C-DAC, Pune. The task before the team — sourcing, reading and digitising vast amounts of audiovisual content — was not an easy one, said project director from IGNCA, Pratapanand Jha.

"Sourcing some of the rare audiovisual content, like the music compositions provided by Kashi Sangeet Samaj or interviews of key writers, has been extremely difficult, given that they are almost a 100 years old... content with no copyright restrictions was carefully sourced," said Jha.

As they were flooded with art forms from all parts of the country, the archival team had to synchronise the content in a manner that any keyword, in any language, could be easily skimmed and recognised by the software.

The team, which started working on the project in 2014, today has over 2 petabytes of audiovisual content, covering over 1,000 artistes and hundreds of Indian languages and dialects. A majority of the content was contributed by the Bhopal-based Indira Gandhi Rashtriya Manav Sangrahalay, said Jha.

In addition to the digital repository, there is a 'back-up' as well, as all the audiovisual content has been saved on tapes. "These tapes have been preserved at two seismically different zones, one at Delhi and another at Bengaluru, to ensure that they are permanently preserved," said Jha.

In the next phase, the project aims to digitise content upto 5 lakh hours, within the next five years.

# 'एनसीएए' जगात विश्वासार्ह

## ब्रिटनच्या 'पीटॅब' संस्थेकडून 'सी-डॅक'च्या प्रकल्पाला मानांकन

Harsh.Dudhe
@timesgroup.com
Tweet : @HarshDudheMT

**पुणे :** दुर्मिळ संगीत, लघुपट, कला, नृत्यप्रकार, नाटकांचे दर्जात्मक डिजिटायजेशन करून त्याचे संग्रहण करण्यासाठी प्रगत संगणन विकास केंद्राच्या (सी-डॅक) 'नॅशनल कल्चरल ऑडियोव्हिज्युअल अर्काइव्हज' (एनसीएए) प्रकल्पाला जगातील पहिली 'विश्वासार्ह डिजिटल रिपॉझिटरी'

मटा विशेष

होण्याचा मान मिळाला आहे. ब्रिटनच्या प्रख्यात 'प्रायमरी ट्रस्टवर्दी डिजिटल रिपॉझिटरीज ऑर्थोरायझेशन' (पीटॅब) संस्थेने प्रकल्पाला 'आयएसओ १६३६३' मानांकन प्रदान केले आहे. त्यामुळे जगात सर्वांत पहिली विश्वासार्ह डिजिटल रिपॉझिटरी तयार करण्याचा मान सी-डॅकच्या प्रकल्पाला मिळाला आहे.

सी-डॅकच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर डिजिटल प्रिझर्व्हेशन' आणि 'इंदिरा गांधी नॅशनल सेंटर फॉर आर्टस्' (आयजीएनसीए) यांनी मिळून एनसीएए प्रकल्प पूर्ण केला. सी-डॅकच्या 'डिजिटालय' प्रणालीचा वापर करून एनसीएए हा प्रकल्प सुरू करण्यात आला होता, असे सी-डॅकचे सहसंचालक डॉ. दिनेश कात्रे यांनी 'मटा'ला सांगितले. या प्रकल्पांतर्गत दर्जात्मक डिजिटल संग्रहण करण्यासाठी उत्तम टूल्स आणि तंत्रज्ञानाचा विकास, मानांकन आणि मार्गदर्शक तत्त्वे, विविध संस्थांमध्ये तंत्रज्ञानाचा समन्वय साधणे आणि डिजिटल रिपॉझिटरी निर्माण करण्याची प्रक्रिया राबविणे, यासाठी विश्वासार्ह डिजिटल रिपॉझिटरी निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. आता ही रिपॉझिटरी तयार झाली असून त्यामध्ये देशातील दुर्मिळ संगीत, लघुपट, कला, नृत्यप्रकार, गाजलेली नाटके, कला क्षेत्रातील दिग्गजांच्या कार्यशाळा आदींचे उत्तम डिजिटायजेशन आणि त्याचे संग्रहण करण्यात आले आहे.

'आयजीएनसीए'ला देशातील कलाक्षेत्र फाउंडेशन, नॅशनल अर्काइव्हज ऑफ इंडिया, नाट्य शोध संस्था, इंदिरा गांधी राष्ट्रीय मानव संग्रहालय, केरळ कला मंडलम, रिजनल रिसोर्सेस सेंटर फॉर फोल्क परफॉर्मिंग आर्टस्, साहित्य अकादमी, संगीत अकादमी आणि श्री काशी संगीत समाज अशा २१ संस्थांमधील सुमारे ९ हजार ६०० ऑडियोव्हिज्युअल्सचे डिजिटायजेशन करून संग्रहण करण्यात आले आहे. साधारण २ पीटाबाइट इतका डेटा २३ हजार तासांचे संग्रहण झाले असून ते नागरिकांना पाहण्यासाठी ऑनलाइन उपलब्ध आहे. येत्या मार्च महिन्यात ३० हजार तासांचे संग्रहण करण्यात येणार आहे. तर, पुढच्या पाच वर्षांत पाच लाख तासांच्या दुर्मिळ ऑडियो-व्हिज्युअल्सचे डिजिटायझेशन करण्यात येणार असल्याचे, डॉ. कात्रे यांनी सांगितले.




**जगात डिजिटायजेशनचे संग्रहण करण्यासाठी आतापर्यंत मानांकन असणारी एकही डिजिटल रिपॉझिटरी उपलब्ध नव्हती. तसेच, रिपॉझिटरीची मानके तयार नव्हती. मात्र, एनसीएएला जगातील पहिल्या विश्वासार्ह डिजिटल रिपॉझिटरीचा मान मिळाला आहे. त्यासाठी एक उत्कृष्ट आणि दर्जेदार डिजिटल रिपॉझिटरी कशी असली पाहिजे, याचे उदाहरण एनसीएएने संग्रहण करून प्रस्थापित केले आहे. त्यामुळे आता केंद्र सरकारला डिजिटल संग्रहण धोरण ठरविण्यासाठी उपयोग होणार आहे. सी-डॅक आणि देशासाठी ही आनंदाची गोष्ट आहे.**

**- डॉ. दिनेश कात्रे,** सहसंचालक, सी-डॅक

### दुर्मिळ संग्रहण

नागरिकांना दुर्मिळ संगीत, लघुपट, विविध कला, नृत्यप्रकार, नाटकांचे दर्जात्मक डिजिटायजेशन करून त्यांचे सुमारे २३ हजार तासांचे संग्रहण 'नॅशनल कल्चरल ऑडियोव्हिज्युअल अर्काइव्हज'च्या (एनसीएए) वेबसाइटवर पाहता येईल. या संग्रहणामध्ये देशातील कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातील दिग्गज व्यक्ती व कलाकारांचा समावेश आहे. नागरिकांना http://ncaa.gov.in या वेबसाइटवर विनामूल्य हा सांस्कृतिक खजिना पाहणे व ऐकण्यासाठी उपलब्ध आहे.